# *वार्तापत्र*

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांकः- १३/०१/२०१७

## *जिल्हयात ट्रामा टिम तयार*

पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्ये मार्गदर्शन व जिल्हा महिला बाल विकास यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ११/०१/२०१७ रोजी गडचिरोली व १२/०१/२०१७ रोजी अहेरी येथे जिल्हा ट्रामा टिम ला तयार करुन प्रशिक्षण देण्यात आले.

महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने बलात्कार/बालकांवरील लैगिंक अत्याचार यामध्ये पिडीत महिला व बालकांना अर्थसहाय्य व पुनर्वसनासाठी मनोधैर्य ही योजना दिनांक २०/१०/२०१३ पासून अंमलात आणली आहे. या योजनेअंतर्गत बलात्कार/बालकावरील लैगिंक अत्याचार यामध्ये पिडीत महिला व बालक यांना तातडीने आधार मिळण्याकरीता व मानसिक आघातातून बाहेर पडण्यासाठी सहाय्य करण्याचे उद्देशाने गडचिरोली जिल्हयात मनोधैर्य टिम (जिल्हा ट्रामा टिम) गठीत करण्यात आली असून सदर गठीत टिम मध्ये पोलीस विभाग आरोग्य विभागाचे अधिकारी/कर्मचारी/जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्या अधिपत्याखालील सर्व संरक्षण अधिकारी, बाल परिविक्षा अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचा सहभाग आहे.

नमुद ट्रामा टिम प्रत्येक पोलीस स्टेशन/ग्रामीण रुग्णालय स्तरावर पोलीस अधिकारी, वैद्यकीय अधिकारी ग्रामसोपचार तज्ञ आणि नर्स आदी ट्रामा टिम मध्ये सहभाग राहणार आहेत.

बलात्कार/बालकारील लैगिंक अत्याचार इत्यादी घटना नंतर संबंधीत महिला व बालक व त्यांच्या कुटुंबीय सदस्य जाब-जबाब देणाच्या मनस्थितीत नसतात. सदर घटनानंतर त्यांना त्या आघातातून बाहेर काढण्यासाठी ट्रामा टिमची स्थापना करण्यात आली.

सदर प्रशिक्षणामध्ये बलात्कार/बालकांवरील लैंगिंक अत्याचारीत घटनातील महिला व बालक आणि त्यांचे कुटुंबियांना त्याआघातातून बाहेर काढण्यासाठी जिल्हयातील गठीत ट्रामा टिम मधील सदस्यांना तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण देण्यात आले.